# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मु.) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmchq@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/ १९९ /२०२६-२७
दि. २४ /०९/२०२६

**परिपत्रक**

**विषय : महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रम तसेच बाहेरुन येणाऱ्या मान्यवर पाहुण्यांबाबत मा. महापौरांना पूर्वसूचना व संपूर्ण माहिती देण्याबाबत.**

**संदर्भ : मा. महापौर यांचेकडील जा.क्र.मनपा/महापौर/२२९/२०२६-२७, दि. २२/०९/२०२६ रोजीचे पत्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमांमध्ये मा. महापौरांचा सहभाग, प्रोटोकॉल तसेच पदाचा मान-सन्मान आणि प्रतिष्ठा यांचा योग्य विचार होणे आवश्यक असल्याने मा. महापौरांना कोणतीही पूर्वकल्पना न देता कार्यक्रमांचे आयोजन करणे अथवा बाहेरून येणाऱ्या मान्यवर पाहुण्यांच्या भेटीबाबत ऐनवेळी माहिती देणे ही बाब योग्य प्रशासकीय कार्यपद्धतीस धरून नाही. त्यामुळे महानगरपालिकेशी संबंधित कोणताही शासकीय, प्रशासकीय, सामाजिक, सांस्कृतिक अथवा अन्य कार्यक्रम आयोजित करताना तसेच महानगरपालिकेस कोणतेही मान्यवर, शिष्टमंडळ अथवा बाहेरील पाहुणे भेट देणार असल्यास, त्याबाबतची पूर्वसूचना तसेच संबंधित कार्यक्रमाचे स्वरूप, दिनांक, वेळ, स्थळ, उपस्थित मान्यवरांची नावे व पदे, कार्यक्रमाचा उद्देश आणि महापौरांची अपेक्षित भूमिका याबाबतची संपूर्ण माहिती वेळेत मा. महापौर कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावी.

मा. महापौर कार्यालयास कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यास अथवा मान्यवर पाहुण्यांच्या भेटीबाबत माहिती न दिल्यास सदर बाबीची गंभीर दखल घेऊन संबधित अधिकाऱ्यांवर नियमांनुसार प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी. तसेच मा.महापौर पदाचा मान-सन्मान व महानगरपालिकेचा प्रोटोकॉल अबाधित राहील, याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**१. सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख, मिरा भाईंदर महानगरपालिका**
**२. KPMG टिम**